# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission

क्र : मविनिआ/माअअ/०३/२०१६/१४२० दि. ०४.०२.२०१६

प्रति,
ज्योती रोहरा,
बॅरेक नं. ५३३, रुम नं. ८,
कैलास पर्वत हॉटेलचे मागे,
उल्हासनगर - २
जि. - ठाणे.

**विषय :- आपला दि. ६ जानेवारी, २०१६ रोजीचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अर्ज.**

महोदय,

आपला दि. ६ जानेवारी, २०१६ रोजीचा माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (१) प्रमाणे केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दि. ७ जानेवारी, २०१६ रोजी प्राप्त झालेला आहे.

सदर अर्जात आपण उपस्थित केलेल्या माहितीस अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, आपणांस आवश्यक असलेल्या माहितीचा खुलासा खालीलप्रमाणे आहे.-

| अ.क्र. | आवश्यक माहितीचा तपशील | खुलासा |
|---|---|---|
| १. | श्री. भोजवानी यांनी दिनांक ०८.१०.२०१५ च व दिनांक ०४.०७.२०१५ ह्या दोन पत्रांवर आपणाकडून काय कारवाई करण्यात आली त्याची स्वाक्षरी प्रत मिळावी. | श्री. भोजवानी यांचा दिनांक ०८.१०.२०१५ रोजीचा अर्ज महावितरण कंपनीला या कार्यालयाच्या दि. २.०१.२०१५ रोजीच्या पत्रासोबत आवश्यक कार्यवाहीकरीता पाठविण्यात आलेला आहे. (सोबत प्रत जोडली आहे)<br>श्री. भोजवानी यांचा दिनांक ०४.०७.२०१५ चा अर्ज आयोगाच्या कार्यालयाच्या आवक नोंदणीमध्ये प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. |
| २. | सदर श्री भोजवानी यांच्या पत्राचे उत्तर फक्त मुंबई हायकोर्टाने दिले आहे बाकी विभागांनी दिले नाही म्हणून ज्या अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची १२ आठवड्यात उत्तर नाही दिले म्हणून शिस्तभंग किंवा सेवाहमी कायदा नियम आहे त्या अंतर्गत कारवाई करण्यात आली की नाही याची स्वाक्षरी प्रत मिळावी. | लागू नाही. |

उपरोक्त दिलेली माहितीबद्दल आपले समाधान न झाल्यास आपण प्रथम अपीलीय अधिकारी श्री.अनिलकुमार उके, उपसंचालक (विधी), महाराष्ट्र विद्युत नियामक अयोग, मुंबई यांचेकडे सदर पत्र प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाच्या आत अपीलीय अधिकारी यांचेकडे अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

आपला विश्वासू,

(प्रदीप मोहरे)
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी

सोबत : वरीलप्रमाणे